**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता सर्व विधानसभा मतदारसंघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.विसानि-२०२४/प्र.क्र.९७/उद्योग-६,**
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : २४ ऑक्टोबर, २०२४.

**संदर्भ** :- १.भारत निवडणूक आयोग यांचे क्रमांक ECI/PN/१४९/२०२४, दि.१५ ऑक्टोबर, २०२४ रोजीचे प्रसिद्धीपत्रक.
२. भारत निवडणूक आयोग यांचे क्रमांक ७८/EPS/२०२४ दि.१६ ऑक्टोबर, २०२४ रोजीचे पत्र.

**शासन परिपत्रक**

आपल्या देशाने लोकशाही पद्धती स्वीकारली असून १८ वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांनी प्रत्येक निवडणूकीमध्ये मतदान करणे अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेता लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ मधील कलम १३५(ब) नुसार मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणूकांमध्ये असे दिसून आले आहे की, संस्था/आस्थापना इ. भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नाहीत. त्यामुळे अनेक मतदारांना त्यांच्या मतदानापासून वंचित रहावे लागते, जे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.

२. भारत निवडणूक आयोगाने दि.१५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाव्दारे महाराष्ट्र राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. सदर निवडणूकीचे मतदान **दि.२० नोव्हेंबर, २०२४** रोजी होणार आहे.

**३.** भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक घेतली जाणार आहे. या निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा यासाठी लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ मधील कलम १३५(ब) नुसार खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

I. निवडणूक होणा-या मतदान क्षेत्रातील कोणत्याही व्यवसायात, व्यापारात, औद्योगिक उपक्रमात किंवा इतर कोणत्याही आस्थापनेमध्ये कार्यरत असलेल्या आणि राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला, मतदानाच्या दिवशी सुट्टी दिली जाईल. सदर सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणा-या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना इत्यादींना लागू राहील.

II. पोटकलम (I) नुसार मंजूर झालेल्या सुट्टीच्या कारणास्तव अशा कोणत्याही व्यक्तीच्या वेतनात कोणतीही कपात केली जाणार नाही आणि जर अशा व्यक्तीला अशा दिवसासाठी सामान्यतः वेतन मिळणार नाही या आधारावर कामावर ठेवले असेल, तरीही त्या दिवशी त्याला सुट्टी दिली नसती तर त्याने काढले असते असे वेतन त्याला अशा दिवसासाठी दिले जाईल.

III. जर एखाद्या नियोक्त्याने उप-कलम (I) किंवा उप-कलम (II) च्या तरतुदींचे उल्लंघन केले, तर असा नियोक्ता निवडणूक आयोगाच्या नियमानुसार शिक्षेस पात्र असेल.

IV. हे कलम अशा कोणत्याही मतदाराला लागू होणार नाही ज्यांच्या अनुपस्थितीमुळे तो ज्या रोजगारामध्ये गुंतला आहे त्या रोजगाराच्या संदर्भात धोका किंवा मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते.

V. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक राहिल.

VI. वर नमूद केल्यानुसार उद्योग विभागांतर्गत येणा-या सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्थांमध्ये, औद्योगिक उपक्रम इत्यादींच्या आस्थापनांनी वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुद्ध योग्य कारवाई करण्यात येईल.

**३.** सदर परिपत्रक भारत निवडणूक आयोग यांचे क्रमांक क्रमांक ECI/PN/१४९/२०२४, दि.१५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकास आणि भारत निवडणूक आयोग यांचे क्रमांक ७८/EPS/२०२४ दि.१६ ऑक्टोबर, २०२४ रोजीचे पत्र यांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

**४.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१०२४१५२८००५५१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHAMKANT SURESH SONAWANE

Digitally signed by SHAMKANT SURESH SONAWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR DEPARTMENT,
2.5.4.20=9d538bbb1d8b0fb128f2644b7e46b2a597ff7be83401388555b0d4baa1874713, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=0FACA31EEA9D440C573E323F027F4B548138E0057E0DAA48093F263662E5B218, cn=SHAMKANT SURESH SONAWANE
Date: 2024.10.24 15:29:30 +05'30'

**( शामकांत सोनवणे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत**:- उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधित आस्थापनांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

१. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
२. मा. प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी मंत्रालय ,मुंबई.
३. विकास आयुक्त, उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य व खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ मर्या, मुंबई.
७. व्यवस्थापकीय संचालक ,महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई.
८. संचालक, शासकीय मुद्रण लेखन सामग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई.

९. व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम लि. बिल्डींग क्र.४, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, गुरू हरगोविंदजी रोड, चकाला, अंधेरी, (पुर्व), मुंबई.
१०. उद्योग समूह FICCI, MCCA, CMIA.
११. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१२. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र राज्य.
१३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांना व्यापक प्रसिद्धी देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
१४. उद्योग विभागातील सर्व कार्यासने.
१५. निवड नस्ती(उद्योग-६).

**********************

**Legislative Assembly General Election 2024**

Regarding granting leave to voters in the Civil Legislative Assembly constituency to vote

**Government of Maharashtra**
**Department of Industries, Energy, Labor and Mines,**
Government Circular No. VIsani-2024/P.No.97/Industry-6,
Mantralaya, Mumbai-32

Date: 24 October, 2024.

**Ref: 1. Election Commission of India Press Release No. ECI/PN/149/2024, dated 15th October 2024**
**2. Election Commission of India's letter No. 78/ EPS/2024, dated 16 October, 2024.**

**Government Circular**

The government has adopted a democratic system and it is mandatory for every registered citizen above 18 years to vote in each election. In light of this, under Section 135(b) of the Representation of the People Act, 1951, leave is generally granted to voters to exercise their voting rights or suitable arrangements are made during working hours. However, in recent elections, it has been observed that institutions/establishments do not grant adequate leave. This results in many voters being unable to cast their votes, which is extremely detrimental to democracy.

1. The Election Commission of India has announced the schedule for the Legislative Assembly General Election 2024 in Maharashtra through its letter dated 15 October, 2024. The voting for this election will take place on 20 November, 2024.

2. As per the directives issued by the Election Commission of India, the Legislative Assembly General Election will be conducted in the Civil Legislative Assembly constituency of the State. To ensure that civil voters can exercise their voting rights properly, the following orders are being issued under Section 135(b) of the Representation of the People Act, 1951:

I. Any individual eligible to vote in the upcoming election, whether in any establishment, industry, or any other organization, will be granted leave to vote. This leave will apply to civil industry groups, corporations, companies, institutions, industrial enterprises and other establishments coming under the purview of the Department of Industries.

II. No deductions will be made from the salary of any individual granted leave under sub-clause (I) for this reason, and if such an individual is generally not paid for that day due to being on leave, they will be entitled to receive the salary they would have earned had they not taken leave on that day.

III. If any employer violates the provisions of sub-section (I) or sub-section (II), such employers shall be liable to action as per rule of the Election Commission.

IV. This provision will not apply to any voter whose absence may cause significant damage in relation to the employment they are engaged in.

V. In case of adverse circumstances, if it is not possible to grant full leave to workers, contractors, employees, etc., a minimum of two hours of leave can be granted to workers involved in the voting process to exercise their right to vote. In this regard, it will be necessary to obtain prior permission from the relevant authorities and the relevant forest commission contractor. In any situation, it is essential for establishments to ensure that voters are granted at least two hours of leave for voting.

VI. As mentioned above, the establishments of the industrial sector, including public corporations, industrial groups, companies, and institutions, must ensure strict compliance with the above instructions. If complaints arise regarding the inability to vote due to the lack of appropriate leave or time received from voters, appropriate action will be taken against them.

3. This notification is issued by the Election Commission of India under serial number ECI/PN/149/2024, dated October 15, 2024, in accordance with the guidelines of the Election Commission of India under serial number 78/ EPS/2024, dated October 16, 2024.

4. This government notification is available on the Maharashtra Government's website www.maharashtra.gov.in, with the reference number 202410241528005510. This notification is being communicated digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**(SHAMKANT SONAWANE)**
**Karyassan Officer, Government of Maharashtra.**

Copy forwarded with a request to bring the above circular to the attention of all concerned establishments.

1. State Election Commission, State of Maharashtra, New Administrative Building, Opposite Mantralaya Building, Mumbai-32
2. Principal Secretary and Chief Electoral Officer, Mumbai.
3. Development Commissioner, Directorate of Industries, New Administrative Building, Opposite Mantralaya Building, Mumbai.
4. Chief Executive Officer, Maharashtra Industrial Development Corporation, Mumbai. 5.
5. Chief Executive Officer, Maharashtra State and Khadi and Village Industries Board, Mumbai.
6. Managing Director, Maharashtra State Small Enterprise Development Corporation Marya, Mumbai.
7. Managing Director, Maharashtra State Financial Corporation, Mumbai.
8. Director, Directorate of Government Printing Stationery and Publications, Mumbai. 9.
9. Managing Director, Sicom Ltd. Building No.4, Solitaire Corporate Park, Guru Hargovindji

Road, Chakala, Andheri, (East), Mumbai.

10. Industry groups FICCI, MCCA, CMIA.
11. All Collectors, Maharashtra State.
12. All General Managers, District Industries Centre, Maharashtra State.
13. Forwarded to Director General, Directorate General of Information and Public Relations, Ministry, Mumbai with request for wide publicity.
14. All the establishments in industry sector.
15. Select File (Industry-6).